सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पीत
तरतूदीचे वितरण करणेबाबत.
छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान
योजना (राज्यस्तर) (२४३५ ००८२).

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र.कृकमा ०७१७ / प्र.क्र.१३७/२-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०१७

वाचा :-

१. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. २८.६.२०१७ व दि. ८.९.२०१७
२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२१/२-स, दि. २७.७.२०१७
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/४/२०१७
४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा --प्रशा ५, दि.१०.५.२०१६
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.६.२०१७
६. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक २०१७/प्र.क्र.१२९/अर्थ ३ दि.१८.८.२०१७

प्रस्तावना:-

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ शासनाने उपरोक्त वाचा क्र १ शासन निर्णय दि. २८.६.२०१७ व दि. ८.९.२०१७ अन्वये जाहीर केलेली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील थकबाकीदार शेतकरी ज्यांनी दि. १.४.२००९ नंतर पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज घेतले व असे कर्ज दि ३०.६.२०१६ रोजी थकीत आहे अशा शेतक-यांचे मुद्दल व व्याजासह रु १.५० लाख या मर्यादेत कर्ज काही निकषाच्या अधिन राहून माफ करण्यात आले आहे. तसेच शा.नि.दि. ५.७.२०१७ या योजनेच्या लाभासाठी सन २०१६-१७ वर्षात घेतलेल्या कर्जाची परतफेड कालावधी दि. ३०.६.२०१७ ऐवजी दि.३१.७.२०१७ करण्यात आला आहे. तसेच सन २००९-१० पासून केलेल्या पूनर्गठनास सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

तसेच रु १.५० लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतक-यांसाठी एकवेळ समझोता योजना (OTS) योजनेअंतर्गत रु १.५० लाख एवढया रकमेचा लाभ देण्यात येणार आहे. तथापि, यासाठी अशा शेतक-यांनी त्यांच्या हिश्श्याची संपूर्ण परतफेड बँकेस जमा केल्यानंतर शासनामार्फत रु. १.५० लाख अदा करण्यात येईल.

या योजनेमध्ये सन २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षातील घेतलेल्या पीक कर्जाची दि. ३१.७.२०१७ पर्यंत परतफेड केल्यास अशा शेतक-यांनाही पीक कर्जाच्या २५% अथवा रु २५००० लाभ देण्यात येणार आहे. सदर योजनेमध्ये सन २००९-१० ते २०१५-१६ वर्षातील पुनर्गठन केलेल्या रकमेची थकबाकी असल्यास किंवा त्यांची नियमित परतफेड केल्यासही शेतक-यांना लाभ देण्यात येणार आहे. सदर कर्जमाफी योजनेचा राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बँकांनी शेतक-यांना दिलेल्या कर्जास लागू राहील. सदर कर्जमाफी योजनेसाठी काही निकष निश्चित करण्यात आले आहेत.

"छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ (राज्य स्तर)(२४३५ ००८२)"-३३ अर्थसहाय्य या योजनेवरील खर्चाकरीता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

"छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ (राज्य स्तर)(२४३५ ००८२)"- ३३ अर्थसहाय्य या योजनेवरील खर्चाकरीता सन २०१७-१८ वर्षात मंजूर तरतूदीपैकी रु. १२,५८५,००,००,०००/- (रुपये बारा हजार पाचशे पंच्याऐंशी कोटी फक्त) एवढया निधीचे वितरण करुन खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/४/२०१७ व दिनांक ३०.६.२०१७ अन्वये उपरोक्त बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ पैकी परिच्छेद ९ वगळता इतर सर्व परिच्छेद या योजनेस लागु नाहीत. तसेच या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या सर्व संबंधित बाबींची पूर्तता होत आहे.

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित बँका / संस्थांस वितरीत करताना आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रकमेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याची प्रत शासनास सादर करावी.

४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/४/२०१७ च्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ संदर्भात सदर योजना ही नियमित राज्य योजना असल्याने व निधी संबंधित बाबींखाली नव्याने वितरीत होणार असल्याने वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता आहे.

५. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य कार्यालयाने वित्त विभागाच्या उपरोक्त वाचा क्र ३, ४,५ व ६ येथील शासन परिपत्रकामधील सूचनांचे पालन करावे.

६. वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा प्रशा ५, दिनांक १०.५.२०१६ मधील परिच्छेद "अ" नुसार या प्रकरणी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

(१) **विभागास प्रदान वित्तीय अधिकार** वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/४/२०१७ अन्वये उपरोक्त सर्व बाबींखाली खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पूर्तता होत आहे.

(२) **मंजूर निधी** :- या योजनेच्या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी रु. १७९७९,००,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पीत असून त्यापैकी यापूर्वी निधी वितरीत झाला नाही.

(३) मागील ३ महिन्यापूर्वी निधी वितरीत न केल्यामुळे दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झालेला नाही.

(४) ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षांतर्गत १ वर्षापासूनचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. :- सध्या लागू नाही.

(५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देताना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यात आली आहे :- लागू नाही.

(६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करताना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे :- होय.

(७) बांधकाम विषयक प्रस्तांवाना प्रशासकीय मान्यता देताना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात करावा. :- लागू नाही.

(८) खरेदीविषयक प्रक्रिया अद्ययावत संबंधित शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा :- लागू नाही.

(९) साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरित करावी :- लागू नाही.

७. सदर तरतूद संबंधित बँकांना अदा करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच लेखाधिकारी, अधिन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी आहरण करुन हा खर्च वेळेत होईल हे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पहावे. तसेच या बाबतचा अहवाल व खर्चाची माहिती वेळो वेळी शासनास पाठवावी.

८. सदरहू रक्कम मागणी क्रमांक व्ही- २, २४३५-- इतर कृषिविषयक कार्यक्रम, ००, ६० - इतर, १०१ -- शेतक-यांच्या कर्ज माफीसाठी योजना, (००)(०१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना- २०१७ (राज्य स्तर) (२४३५ ००८२)- ३३- अर्थसहाय्य (दत्तमत) या लेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ या वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून खर्च करण्यात यावा.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारीक संदर्भ क्रमांक अनौसं ४५९/१७/व्यय-२, दिनांक ५.१०.२०१७ व अनौसं ३१०/अर्थ-१३ दिनांक ९.१०.२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१६१८२९५०४२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Deepak M Rane

Digitally signed by Deepak M Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMTD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2aef4bf230b6667b08affe7946621e30ca1ff655241ee17d2cbdfd697d7222f5, cn=Deepak M Rane
Date: 2017.10.16 18:17:24 +05'30'

(दि.म.राणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखाकार, महाराष्ट्र- १, मुंबई.
३. महालेखाकार, महाराष्ट्र- २, नागपूर.
४. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
५. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
६. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प -१३ ,मंत्रालय, मुंबई
७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. कोषागार अधिकारी, पुणे.
९. अवर सचिव (कार्यासन १७ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय
१०. निवड नस्ती-२-स.